**<u>ठळक बातम्या.</u>**

- भारत निवडणूक आयोगाकडून लोकसभा निवडणुकीसाठी आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीकरता मार्गदर्शक तत्त्व जारी

- यंदाच्या लोकसभा निवडणुकीत राज्यातलं मतदानाचं प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न सुरू असल्याचं मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांचं प्रतिपादन

- दहा वर्षांत भाजपा सरकारनं विकसीत केलेल्या प्रारुपात वंचितांना प्राधान्य दिल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- अधिकार आणि विचारांचं केंद्रीकरण असलेली भाजपची विचारसरणी आणि काँग्रेसची सर्वसमावेशक विचारसरणी हाच आपला लढा असल्याचं काँग्रेस नेते राहुल गांधी यांचं प्रतिपादन

**आणि**

- महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात अंतिम सामना

**<><><><><><>**

निवडणूक आयोगानं लोकसभा आणि चार राज्यांच्या विधानसभा निवडणुकीच्या घोषणेनंतर आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक तत्त्व जारी केली आहेत. निवडणूक आयोगानं कॅबिनेट सचिव, सर्व राज्यांचे मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांना यासंदर्भात पत्र पाठवलं असून रेल्वे स्थानकं , बस आगार इत्यादी सार्वजनिक ठिकाणांवरचे

राजकीय जाहिराती असलेले सर्व अनधिकृत फलक, बॅनर वगैरे ४८ तासांमध्ये हटवण्याचे निर्देश दिले आहेत. खासगी मालमत्तेचं प्रदर्शन करणाऱ्या अनधिकृत राजकीय जाहिराती ७२ तासांच्या आत हटवल्या पाहिजेत.

कोणताही राजकीय पक्ष किंवा उमेदवाराला निवडणूक प्रचारासाठी सरकारी वाहन वापरता येणार नाही. इलेक्ट्रॉनिक आणि प्रिंट मीडियावर सरकारी लाभ सांगणाऱ्या जाहिरातींना अनुमती नाही. मुख्य निवडणूक अधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी अशा प्रकारच्या जाहिराती रोखण्यासाठी त्वरित कारवाई करतील. तसंच निवडणूक अधिकारी राज्य सरकारी विभागांच्या संकेतस्थळांवरून राजकीय कार्यक्रमांची माहिती लगेचच हटवतील, असं आयोगानं स्पष्ट केलं आहे. मतदार जागरूकतेसाठी रेडियो, दूरचित्रवाणी, सिनेमा आणि सरकारी वाहिन्यांच्या माध्यमातून कार्यक्रम प्रसारित करता येतील. विधानसभा निवडणूक होणाऱ्या राज्यांमध्ये तक्रारींचं निवारण होण्यासाठी १९५० या क्रमांकावर एका कॉल सेन्टरची स्थापना करण्यात येत असल्याचंही आयोगानं नमूद केलं आहे.

**<><><><><><>**

राज्यात लोकसभा निवडणुकीत मतदानाचं प्रमाण ७५ टक्क्यांपर्यंत नेण्यासाठी विविध पातळीवर प्रयत्न सुरू असल्याचं राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांनी म्हटलं आहे. भारत निवडणूक आयोगानं लोकसभा निवडणुकीचं वेळापत्रक जाहीर केल्यानंतर ते काल मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. यावेळी त्यांनी राज्याच्या निवडणूक तयारीविषयी माहिती दिली. सद्यस्थितीत राज्यात ९ कोटी २० लाख ३१ हजार ७० मतदारांची नोंद आहे, यात ४ कोटी ७८ लाखांहून अधिक पुरुष, ४ कोटी ४१ लाखांहून अधिक महिला, तर साडेपाच ५ हजारांपेक्षा जास्त तृतीयपंथीयांचा समावेश असल्याचं त्यांनी

सांगितलं. यंदा राज्यात सुमारे ९८ हजार मतदान केंद्र उभारण्याचं नियोजन आहे. लोकसभा निवडणुकीत राज्यात प्रत्येक उमेदवाराला ९५ लाख रुपये आणि विधानसभा निवडणुकीत ४० लाख रुपये खर्च करण्याची मुभा आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

**<><><><><><>**

गेल्या दहा वर्षांत भाजपा सरकारनं नवीन प्रारुप विकसीत केलं असून त्यात वंचित लोकांना प्राधान्य देल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सांगितलं. नवी दिल्लीत काल इंडिया टुडे कॉन्क्लेवमध्ये नमो ड्रोन दीदी योजने अंतर्गंत महिला स्वयं सहाय्यता गटाला एक हजार ड्रोनचं वाटप करण्यात आलं त्यावेळी ते बोलत होते.

महिलांना ट्रॅक्टर चालवता येणारच नाही, ही समाजाची मानसिकता बदलण्यासाठी ग्रामीण भागातील युवतींना कृषी ड्रोनचं वाटप केल्याचं प्रतिपादन मोदी यांनी यावेळी केलं. महिलांमध्ये उपजत उत्तम काम करण्याचं कसब असतं, त्यामुळेच आमच्या सरकारनं जबाबदार कामांसाठी त्यांची निवड केली आहे. त्यातून त्या आर्थिक आणि तांत्रिकदृष्ट्या ही सक्षम होतील, असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><><>**

नव भारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत केंद्र सरकाच्या वतीनं आज देशभरातल्या २३ राज्यांमध्ये पायाभूत साक्षरता आणि संख्यात्मक मूल्यमापन चाचणी घेतली जाणार आहेत. या देशव्यापी मूल्यांकनात सुमारे ३७ लाख विद्यार्थी सहभागी होणार असल्याचं केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं कळवलं आहे. यात सहभागी झालेल्या राज्य आणि केंद्रशासीत प्रदेशांच्या प्रत्येक जिल्ह्यात ही चाचणी होईल. वाचन, लेखन आणि संख्यिकीविषयक अशा घटकांच्या आधारे हे मूल्यांकन केले जाईल. ही

चाचणी विद्यार्थ्यांच्या प्रादेशिक भाषांमध्ये घेतली जाणार असल्याचंही मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><><>

भारतीय नौदलानं समुद्री चाच्यांनी अपहरण केलेल्या एमव्ही रुएन या मालवाहू जहाजातील १७ ओलीसांची यशस्वी सुटका केली. या कारवाईत नौदलानं सर्व ३५ समुद्री चाच्यांनाही ताब्यात घेतलं. हे जहाज भारतीय किनारपट्टीपासून २ हजार ६०० किलोमीटर अंतरावर होतं, त्याला आयएनएस कोलकातानं घेराव, नियोजनबद्ध कारवाईनं थांबण्यास भाग पाडल्याची माहिती नौदलाच्या अधिकाऱ्यांनी दिली. या कारवाईत जहाजावरचा बेकायदेशीर शस्त्रसाठा आणि दारूगोळाही जप्त केल्याचंही त्यांनी सांगितलं.

ही कारवाई ४० तासांपेक्षा जास्त काळ चालली, आणि त्यात आयएनएस सुभद्रा या भारतीय युद्धनौका, ड्रोन, सागरी गस्ती विमानं आणि मार्कोस प्रहार या जहाजानंही सहभाग घेतल्याची माहिती या अधिकाऱ्यांनी दिली.

<><><><><><>

अधिकार आणि विचारांचं केंद्रीकरण झालेली भाजपची विचारसरणी आणि काँग्रेसची सर्वसमावेशक विचारसरणी असा लढा आपल्याला लढायचा असल्याची भावना काँग्रेस नेते, खासदार राहुल गांधी यांनी आज न्याय संकल्पयात्रेच्या समारोपात व्यक्त केली. देशातल्या सर्वच समाजघटकांवर अन्याय होत असला तरी इतरांवरील अन्यायाची त्यांना कल्पना नसल्यानं देशात सत्तेविरोधात आंदोलन उभे राहत नाही, अशी खंतही राहुल गांधी यांनी यावेळी व्यक्त केली.

दरम्यान, आज संध्याकाळी शिवाजी पार्क इथं भारत जोडो यात्रेची समारोप सभा होणार आहे. या सभेच्या माध्यमातून इंडिया आघाडी लोकसभा निवडणुकांच्या प्रचाराची सुरुवात करणार आहे.

<><><><><>

चीनचा मुकाबला करण्यासाठी भारताला आपल्या उत्पादन क्षेत्रावर अधिक लक्ष देण्याची गरज परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी अधोरेखित केली आहे. एका माध्यम समूहानं आयोजित केलेल्या परिषदेत ते बोलत होते. चीनबद्दलचे मुद्दे केवळ सीमाभागाशी निगडित नाहीत, तर आर्थिक बाबींशी संबंधित आहेत. सशक्त अर्थव्यवस्थेच्या जोरावरच चीनचा मुकाबला करता येईल, यादृष्टीनं गेल्या दशकभरापासून भारतानं उत्पादन क्षेत्रावर भर दिला आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी आज दिल्ली कॅपिटल्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात अंतिम सामना होणार आहे. नवी दिल्लीतल्या अरूण जेटली स्टेडियमवर हा सामना होईल. संध्याकाळी साडेसात वाजता सामन्याला सुरुवात होईल.

<><><><><>

ऑल इंग्लंड चॅम्पियनशिप बॅडमिंटन स्पर्धेतील पुरुष एकेरीच्या उपांत्य फेरीत भारताचा लक्ष्य सेन पराभूत झाला. इंडोनेशियाच्या जोनाटन क्रिस्टी यानं त्याला १२-२१,२१-१०,१५-२१ असं पराभूत केलं.

दरम्यान, बर्मिंगहॅममध्ये काल झालेल्या सामन्यात गिंटिंगनं फ्रान्सच्या क्रिस्टो पोपोव याला १९-२१,२१-५,२१-११ पराभूत करत अंतीम फेरीत प्रवेश केला. अंतीम सामना क्रिस्टो पोपोव आणि जोनाटन क्रिस्टी यांच्यात होईल.१९९४ नंतर पहिल्यांदाच इंग्लंड बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेची अंतिम फेरी इंडोनेशियाच्या खेळाडूंमध्ये होणार आहे.

<><><><><>

कृत्रिम बुद्धिमता तंत्रज्ञानामुळे सायबर सुरक्षेशी संबंधीत आव्हानांमध्ये वाढ होऊ शकते, अशावेळी वित्तीय संस्थांनी ग्राहकांच्या माहितीचं संरक्षण करण्यासाठी ठोस प्रयत्न करण्याची गरज भारतीय रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी व्यक्त केली आहे. ते काल आरबीआय लोकपालच्या वार्षिक परिषदेत बोलत होते. वित्तीय व्यवस्थेचे संरक्षक या नात्यानं आरबीआयचं यश केवळ प्रणालीच्या लवचिकतेला चालना देण्यावर अवलंबून नाही, तर आर्थिक परिसंस्थेचा गाभा असलेल्या देशाच्या नागरिकांच्या जीवनात आम्ही आणलेल्या मूल्यावरही अवलंबून आहे, असं ते म्हणाले.

<><><><><>

संयुक्त राष्ट्रानं अफगणिस्तानसाठी सुरू केलेल्या संयुक्त राष्ट्र सहकार्य अभियानाला एक वर्षांची मुदत वाढ देत असल्याचं काल जाहीर केलं. या घोषणेचं तालिबाननं स्वागत केलं आहे. अफगाणिस्तानने आंतरराष्ट्रीय संस्था, प्रामुख्यानं संयुक्त राष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय समुदायाशी राजनैतिक संबंध वाढवणं गरजेचं आहे, असं मत तालिबानचे प्रवक्ते जबिहुल्ला मुजाहिद यांनी व्यक्त केलं आहे.

<><><><><>

आइसलँडच्या रेजेन्स द्वीपकल्पावरच्या ज्वालामुखीचा उद्रेक झाल्यानंतर दक्षिणेकडच्या भागात आपत्कालीन स्थिती जाहीर करण्यात आली आहे. या ठिकाणी ज्वालामुखीचा उद्रेक होण्याची गेल्या डिसेम्बरपासून ही चौथी वेळ आहे. उद्रेकानंतर मोठ्या प्रमाणावर लाव्हा आणि धूर हवेत उडत असल्याचं दिसत आहे.

//<><><><><>//